ICSE ACADEMY
www.spellbeeacademy.com

SpellIndia
INDIA's No. 1
SPELLING BEE
Preparatory Study Material Provider
www.phonicsestore.com

Pati's

# Specimen Papers

# PREPARE

for

# ICSE

Class 10

# Marathi

Pati's

# ICSE ACADEMY: How to Prepare for ICSE Class 10 exams

https://www.spellbeeacademy.com/icse.html

## How to Prepare for ICSE Class 10 exams : Free Resources

Please click on subject to proceed further.

We will keep adding resources here till "March 2026".


So, save this link, keep visiting and stay updated.


( Resources include : Syllabus, Past Year Papers, Specimen Papers, Competency based Questions, Books pdf downloadable, 350+ Term Papers / Prelim Papers of various schools - across subjects, etc. )


01 English Literature
02 English Language
03 Geography
04 History & Civics
05 Physics
06 Chemistry
07 Mathematics
08 Biology
09 Computer Applications
10 Physical Education
11 Hindi
12 Commercial Studies
13 Economics
14 Technical Drawing
15 Environmental Science
16 Home Science
17 Gujarati
18 Marathi
19 French


Pati's

SCAN QR code to buy the book at amazon NOW.







**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects





Pati's
ICSE ACADEMY

# Prepare for ICSE CLASS 10
# Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

Pati's

ICSE ACADEMY

# Specimen Papers

- 2023

Pati's
ICSE ACADEMY

# ICSE 2023 EXAMINATION

## SPECIMEN QUESTION PAPER

## MARATHI

## (SECOND LANGUAGE)

---

*Maximum Marks: 80*

*Time allowed: Three hours*

*Answers to this Paper must be written on the paper provided separately.*

*You will not be allowed to write during the first 15 minutes.*

*This time is to be spent in reading the question paper.*

*The time given at the head of this Paper is the time allowed for writing the answers.*

---

***Section A** is compulsory – **All** questions in **Section A** must be answered.*

*Attempt **any four** questions from **Sections B**, answering at least **one** question each from the two books you have studied and **any two** questions from the same books you have studied.*

*The intended marks for questions or parts of questions are given in brackets [ ].*

---

## SECTION A

*(Attempt **all** questions from this **Section**.)*

**Question 1**

Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :— [15]

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा :—

(i) शालेय जीवन एक सुखद अनुभव–शाळेतील पहिला दिवस-काळाच्या ओघात प्रत्येकाशी जडलेले नाते-मिळवलेली बक्षिसे-अपयश-केलेल्या खोड्या-शिक्षकांकडून मिळालेली शाबासकी/शिक्षा तरीही शाळा-शिक्षकांशी जडलेले प्रेमाचे नाते.....अशा शालेय जीवनातील आठवणींविषयी लिहा.

(ii) पैसा हे जगण्याचे साधन आहे–साध्य नाही. आज माणसांना वाटते की जीवनातील सुख हे पैशांनीच मिळू शकते–हा विचार योग्य आहे का ? अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या पैशांनी विकत घेता येत नाहीत. या संदर्भातील तुमचे विचार मांडा.



Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

(iii) जगात रंग आहेत म्हणून सौंदर्य आहे, विविधता आहे. पण समजा हे 'रंगच नष्ट झाले तर!'..... कल्पना करा व आपले विचार शब्दबद्ध करा.

(iv) 'अति तेथे माती' ही उक्ती स्पष्ट करणारे विचार मांडा किंवा त्यावर आधारित गोष्ट लिहा.

(v) पुढे दिलेले चित्र पहा व त्याआधारे आपल्या मनात कोणते विचार येतात ते शब्दबद्ध करा.



**Question 2**

Write a letter in **Marathi** of approximately **120** words on any **one** of the topics given below :— [7]

खाली दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे पत्र **मराठीत** लिहा :—

(i) तुम्ही तुमचा वाढदिवस घरी साजरा न करता तो अनाथाश्रमातील मुलांबरोबर साजरा केला. त्यावेळी तुम्हांला आलेला अनुभव आपल्या मित्र/मैत्रिणीस लिहा.

(ii) तुमच्या परिसरातील विद्युतपुरवठा वारंवार खंडित होतो त्यामुळे गृहिणी, वृद्ध, विद्यार्थी, कर्मचारी यांना विविध त्रास होत आहेत. या त्रासांची कल्पना देणारे व त्यांविषयी तक्रार करणारे पत्र विद्युतपुरवठा महामंडळाच्या अधिकाऱ्यास लिहा.

**Question 3**

Read the passage given below and answer in **Marathi** the questions that follow, using your own words as far as possible :—

खाली दिलेला उतारा नीट काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वत:च्या शब्दांत **मराठीत** लिहा :—

अबू तुमच्या-**आमच्यासारखाच** सामान्य आयुष्य जगणारा, बेताची परिस्थिती असलेला माणूस होता. मात्र सतत लोकांसाठी झटणारा, धडपडणारा, दुसऱ्यांच्या मदतीस धावणारा....कधी कधी घरातील



Pati's
ICSE ACADEMY

माणसे त्याच्या या दानधर्माबद्दल, परोपकाराबद्दल नाराज होत. त्याच्या भोळेपणावर हसत. एक दिवस अबू गाढ झोपेतून जागा झाला. एका अपूर्व शांततेने आपले मन भरून आले आहे असा त्याला भास झाला. डोळे उघडून त्याने

पाहिले..... तर खोलीत दिव्य प्रकाश पसरला होता. त्याने नजर वर केली......साक्षात देवदूत त्याच्या समोर उभा असलेला त्याने पाहिला. अबू गडबडला. म्हणाला, 'देवदूता, तू इथे कसा ? अन् तुझ्या हातातील वहीत तू काय लिहीत आहेस !''.....माफ कर....माझे काही चुकले का ?''

देवदूत हसत म्हणाला, "अरे, देवाला प्रिय असणाऱ्या माणसांची यादी आहे ही !'' अबू म्हणाला, "देवदूता, तू मग गट चुकलास, अरे, दानधर्म करणारे, देवाला सोन्याचांदिचे दागिने चढवणारे 'अमृतशेठ' शेजारच्या हवेतील शहतात. देवाने कदाचित तिकडे जाण्यासाठी तुला पाठवले असणार !''

देवदूत हसला आणि म्हणाला, "नाही !'' अबूने आश्चर्याने विचारले, "मग या वहीत कोणाचे नाव तू लिहिलेस ?''....."तुझे''....."माझे ?'' "हो तुझेच ! परवा मंदिरासमोर बसलेल्या कुष्ठरोग्याची तडफड तुला पाहवली नाही. तू त्याला दवाखान्यात घेऊन गेलास. काल रस्त्यावरच्या जखमी कुत्र्याला घरी घेऊन आलास.... त्याच्यावर उपचार केलेस.....तुझ्या निष्काम कर्मयोगाचे ओझे वाढतच चाललेय? म्हणून देवाने मला तुझ्याकडे पाठवले.''.....देवदूत अदृश्य झाला.....

जगातील श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील सीमारेषा अशीच अस्पष्ट होताना दिसतेय. मोठमोठी मंदिरे, सोन्याचांदीचे खांब, तासन्तास ताटकळत उभ्या असणाऱ्या भक्तांच्या रांगा, व्ही. आय. पी. लोकांना दर्शनासाठीचे स्पेशल पास, मोठ्या आरत्या, मिरवणुका.....अशा भक्तांना देव सापडला की कुष्ठरोग्याला दवाखान्यात नेणाऱ्या अबूला ?

......मित्रांनो, तुम्हीच सांगा खरा देव कोठे आहे ?

**प्रश्न :**

(i) अबू कोण होता ? तो अचानक झोपेतून जागा का झाला ? [2]

(ii) देवदूत कोणत्या उद्देशाने आला होता ? [2]

(iii) "तू वाट चुकलास.'' असे कोण, कोणास व का म्हणाले ? [2]

(iv) 'अबू हा खरा निरपेक्ष कर्मयोगी होता.'–हे विधान आपणास पटते का ? उदाहरणासह स्पष्ट करा. [2]

(v) तुमच्या मते खरा देव कोठे आहे ? [2]

**Question 4**

Choose the correct answer from the options given :— [8]

दिलेल्या पर्यायांतून अचूक उत्तराची निवड करा :—

(i) मांजर व घोडी यांचे लिंग बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढीलप्रमाणे असेल .......

(a) मांजरी, घोडा

(b) भाटी व घोडा

(c) बोका, घोडा

(d) मांजरे, घोडे

(ii) मित्र व पत्र यांचे वचन बदलल्यास अनुक्रमे उत्तर पुढील प्रमाणे असेल.

(a) मित्र, पत्र

(b) मैत्रीण, पत्र

(c) मित्रे, पत्रे

(d) मित्र, पत्रे

(iii) राजा व सूर्य या शब्दांचे समानार्थी शब्द अनुक्रमे ......

(a) राजेश, नरेश

(b) नरेश, भास्कर

(c) नरेश, सुरेश

(d) भास्कर, नरेश

(iv) जड व आकुंचन या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द अनुक्रमे......

(a) हलके, प्रसरण

(b) अवजड, कुंचन

(c) हलके, फुलके

(d) अवघड, प्रसरण



ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

(v) नवीन शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांचे जीवन निश्तिच उज्ज्वल करील ........... काळ ओळखा.

(a) वर्तमानकाळ

(b) भविष्यकाळ

(c) भूतकाळ

(d) मिश्रकाळ

(vi) शिस्तीने राष्ट्र मोठे बनते ........... वाक्य प्रकार ओळखा.

(a) आज्ञार्थी वाक्य

(b) विधानार्थी वाक्य

(c) प्रश्नार्थी वाक्य

(d) उद्गारार्थी वाक्य

(vii) आई व बायकोच्या भांडणात नेमकी बाजू कोणाची घ्यावी या अडचणीत सापडलेल्या माधवची अवस्था नेहमी ............ अशीच होते.

(a) सासू बोले सुने लागे

(b) नावडतीचे मीठ अळणी

(c) इकडे आड तिकडे विहीर

(d) उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग

(viii) कोणत्याही माणसाची खात्री करून घेतल्यावरच जगन्नाथशेठ त्याला आपल्या घरी कामास ठेवतात

......... योग्य वाक्प्रचार लिहा.

(a) विडा उचलणे

(b) जिवापाड जपणे

(c) शहानिशा करणे

(d) काकदृष्टीने पाहणे


Pati's ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

## SECTION B

*(Attempt **four** questions from this **Section**.)*

*(You must answer at least **one** question from each of the **two** books, you have studied and any **two** other questions.)*

### कथाकुंज

### KATHAKUNJ (Katha Sankalan – Short Stories)

**Question 5**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> काल रात्री धड झोप लागली नव्हती. काल-परवा-पासून या दादेचे जीव खाल्लाय. डोळे रडून-रडून आटल्या विहिरीसारखे झालेत. हल्ली डोळ्यांपुढे केसांचा गुंताच जसा फिरत असतो. डॉक्टर, म्हणतात 'डोळ्यांतले लिक्विड गढूळ झालंय' असू दे...... मरण्यापूर्वी यातना सोसायला हण्यात.
>
> *बेघर*

(i) श्रीकांतला वडिलांची खूर्ची का हवी होती ? [2]

(ii) आईचे कोणते रूप पाहून श्रीकांतला आश्चर्य वाटले ? [2]

(iii) 'तुम्हीच मला सुखाचा मार्ग दाखवून दिला'–असे सुधाताई कोणास व का म्हणाल्या ? [3]

(iv) 'बेघर' हे शीर्षक 4-5 ओळीत स्पष्ट करा. [3]

**Question 6**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> शेत कापलं नाही तर वाऱ्यावर ते एकसारखं सळसळत राहील. त्याच्यात उभं केलेलं बुजगावणं नुसते टकमक बघत हसत राहील आणि बांधावरून शाळेतली मुळं जाऊ लागली म्हणजे त्यांना मोठी गंमत वाटेल-खरं की नाही ? कशाला लोकं कापतात एवढी सुंदर शेतं.......
>
> *चोरी*



Pati's
ICSE ACADEMY

Pati's
ICSE ACADEMY

(i) शाळेतून गोपूची आई गोपूला कुठे घेऊन गेली होती ? का ? [2]

(ii) गोपूने आंबराईत काय पाहिले ? [2]

(iii) गोपूने दिलेली भातकेसरे आईने का नाकारली ? [3]

(iv) प्रस्तुत कथेतून गोपूच्या आईविषयी आपणास काय वाटेत ते लिहा. [3]

**Question 7**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> दुपारचे चार वाजून गेले. झोपी गेलेली काही मुले उठून बसली. काही खिडक्यांमधून बाहेर डोकावू लागली. काही आवारात गोट्यांचा खेळ खेळत होती. कार्यालयातील कारकून कसली तरी आकडेमोड करण्यात गुंग झाला होता. नाकावर घसणारा चष्मा तो अधूनमधून नीट करायचा.
>
> *पुण्य*

(i) हिरालाल आणि माणिकलाल आश्रमात का आले होते ? [2]

(ii) मुलांना खाण्याचा आग्रह करणे बरोबर नाही–असे दादा का म्हणाले ? [2]

(iii) हिराला आणि माणिकलाल यांनी कशाप्रकारे पुण्य मिळवण्याचा प्रयत्न केला ? [3]

(iv) या पुण्याचा परिणाम काय झाला ? दादांना याविषयी अपराधी का वाटत होते ? [3]

## काव्यांगण

## KAVYANGAN (Kavya Sankalan – Poetry)

**Question 8**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

(i) नको देवराया अंत पाहू आता।
प्राण हा सर्वथा फुटी पाहे ।। 1 ।।

*नको देवराया*



Pati's
ICSE ACADEMY

(a) 'नको देवराया' असे कान्होपात्रा का म्हणते ? [2]

(b) कान्होपात्रेची अवस्था कशी झालेली आहे ? ती उदास का होते ? [3]

(ii) देह देवाचे मंदिर। आंत आत्मा परमेश्वर।। 1।।

(a) 'देह देवाचे मंदिर' असे कोण म्हणते ? देव देहात असतो यासाठी संत कोणती उदाहरणे देतात ? [2]

(b) काहो जाता देवळात ? असे ते का म्हणतात ? 'मूढ' असे त्यांनी कोणास म्हंटले आहे ? [3]

**Question 9**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणांत येते सरसर शिखे, क्षणात फिरूनी ऊन पडे.

*श्रावणमास*

(i) मंगल तोरण कशास म्हंटले आहे ? संध्याकाळचे ऊन कसे आहे ? [2]

(ii) संध्याराग आणि बलाकमाला असे कवी कोणास म्हणतो ? [2]

(iii) पाखरे आणि हरिणी यांचा आनंद कसा व्यक्त होतो ? गोप काय करतो ? [3]

(iv) श्रावणात कोणता गंध पसरला आहे ? बाला व ललना काय करत आहेत ? [3]

**Question 10**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील कवितेच्या ओळी वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

नसे राऊळी वा नसे मंदिरी

जिथे राबती हात तेथे हरी !

*जिथे राबती हात*

(i) सावळा-असे कवीने कोणास म्हंटले आहे ? तो कोठे दिसतो ? का ? [2]



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

(ii) स्वेदगंगेकिनारी कोण राहतो ? त्याला कसे प्रसन्न करून घ्यावे ? [2]

(iii) कष्टकऱ्यांची कोणती रूपे कवीने दाखावली आहेत ? ते कशाप्रकारे कर्म करतात ? [3]

(iv) 'कर्म हाच मानवी धर्म आहे'–कवितेच्या आधारे स्पष्ट करा. [3]

### करुणाष्टक

## KARUNASTAK (Kadambari – Novel)

**Question 11**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> आई निमूट मागे फिरली. दार ढकलून घरात आली. मोकळी घागर आणि गठू खाली टाकून अंथरूणावर बसली. आणि मोठ्यानं रामाचा धावा करायला लागली. हुडहुडी भरल्याप्रमाणे तिचा आवाज कापत होता. माझे वडील जागे झाले आणि त्यांनी विचारलं, "काय झालं ? इतकी घाबरी का झाली आहेस ?"

(i) आई का घाबरली होती ? [2]

(ii) लेखक वडिलांच्या कचेरीत का गेले होते ? [2]

(iii) तेथे गेल्यावर लेखक नाराज का झाले ? यानंतर उडया मारत ते शाळेत का गेले ? [3]

(iv) वडिलांनी जेलरच्या नोकरीविषयी कोणता निर्णय घेतला ? का ? यामुळे आईला काय वाटले ? [3]

**Question 12**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> माझा भाऊ प्राथमिक शाळेत शिक्षक झाला. रोज पायपीट करून सात मैलांवर असलेल्या गळवेवाडी हया खेडयात जाऊन पोरं शिकवू लागला. मुले खूश होती. गळवेवाडीची झोपडीतील शाळा बरी चालली होती. पण लवकरच माझा भाऊ पायपिटीला, एकाकी राहणीला कंटाळला. आई, जाताना त्याला भरपूर दशम्या करून देई.

(i) आईने माहेरचा वाडा का विकला ? [2]


Pati's ICSE ACADEMY

(ii) लेखकाच्या भावाने कोणते मोठे काम काढले ? ते मध्येच बंद का पडले ? [2]

(iii) आईला आपली माहेरची जमीन का विकावी लागली ? [3]

(iv) प्रस्तुत भागात आपणास आईची कोणती गुणवैशिष्ट्ये दिसून येतात ? [3]

**Question 13**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

> एखादया भुसनळ्याप्रमाणं डोळे दिपवणारं आणि आजूबाजूचा काळोखा उजळून टाकणारं ह्या आपल्या मुलाचं कर्तृत्त्व आईनं फार जवळून पाहिलं होतं. त्याचा सगळा प्रवासच तिच्या परिचयाचा होता. आपल्याला एकट्यालाच वर-वर जायचं नाही, सर्वांना घेऊन जायचं आहे.

(i) ग.दि. माडगूळकरांनी एका पिढीचं भावजीवन समृद्ध केलं–याविषयी लिहा. [2]

(ii) आई सुशिक्षित नसली तरी सुसंस्कृत, शहाणी होती-असे लेखक का म्हणतात ? [2]

(iii) आईच्या धार्मिकतेविषयी लेखक काय सांगतात ? [3]

(iv) आईला जीवनात काय मिळाले नाही-लेखकाला कोणत्या गोष्टींविषयी खंत वाटते ? [3]

## रंगस्पर्श-एकांकिका संकलन

## RANGSPARSH (Ekankika Sankalan)

**Question 14**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

डॉक्टर : काय झालं काय त्रिंबकराव ?

त्रिंबक : हिला काहीच समजत नाही.

डॉक्टर : शांत व्हा बघू तुम्ही आधी. हे घराचं प्रकरण काय आहे ?

त्रिंबक : (एकदम शांत होऊन) अहो जोगेश्वरीला मी एक घर बांधलंय. खरं म्हणजे काय-गरिबाच चार खोल्याचं एक झोपडं म्हणा ना !

घर



Pati's ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

(i) घरासाठी त्रिंबकरावांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी काय त्याग केला होता ? [2]

(ii) आयुष्यभर त्रिंबकरावांनी घराविषयी कोणते स्वप्न रंगवले होते ? [2]

(iii) होरमसजी कोण होते ? त्यांच्याविषयी त्रिंबकरावांना कोणते स्वप्न पडे ? [3]

(iv) 'घर' या कथेतून लेखाकाने काय सांगायचा प्रयत्न केलेला आहे ? [3]

**Question 15**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

बाई : पण मी खरे सोन्याचे दागिने घालायला काढले नाहीत, ही माझी हुशारी नव्हे ?

शास्त्री : पुरे पुरे तुझी हुशारी ! आधी काय काय गेलं त्याची यादी करू.

बाई : पण काही गेलंच नाही तर यादी कशाची ? (मधू टॉर्चचा झोत टाकत येतो. तेवढ्यात बाई खिडक्या उघडतात)

*चोरी झालीच नाही*

(i) "माझी हुशारी आली ध्यानी की नाही ?" असे शास्त्री बाईंना उद्देशून का म्हणाले ? [2]

(ii) नोटा चोरीस न जाण्याविषयी बाईंचे काय मत होते ? [2]

(iii) "पुरे हं तुमची अक्कल !" असे शास्त्रीजी कोणास म्हणाले ? का ? [3]

(iv) 'शास्त्री' या व्यक्तिरेखेविषयी लिहा. [3]

**Question 16**

Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :—

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :—

मराठे : हा भोळ्या तिच्या घराजवळ राहतो.

देशपांडे : (भोळ्याकडे रोख वळवीत) मग का रे गेला नाहीस तू ?

जोशी : मैत्री राखणं याला जमायचंच नाही।

मराठ्यांच्या शेजारचा कारकून : साधी कर्तव्य कळत नाहीत !

चौथा कारकून : गेली आणि विसरलास !

*चार दिवस*



Pati's ICSE ACADEMY

(i) गेले चार दिवस शकू ऑफिसला का येत नव्हती ? तिच्या अनुपस्थितीविषयी तिच्या सहकाऱ्यांना काय वाटत होते ? [2]

(ii) शकूवर कोणत्या जबाबदाऱ्या होत्या ? नोकरी गेल्यामुळे तिच्या कुटुंबावर काय परिणाम झाला ? [2]

(iii) शकू ऑफिसमध्ये आल्यावर कशाप्रकारे आपले बदललेले आयुष्य सहकाऱ्यांसमोर मांडत होती ? [3]

(iv) 'शकू' या व्यक्तिरेखेतून लेखकाला काय सांगायचे आहे ? [3]


ICSE ACADEMY

Pati's ICSE ACADEMY

# Prepare for ICSE CLASS 10 Marathi

## Free Resources

## SCAN QR CODE Now

Pati's

ICSE Academy

Prepare for ICSE CLASS 10
Free Resources

SCAN QR CODE Now

History/Civics

Geography

Maths

Physics

Chemistry

Biology

Hindi

Physical Education

Computer Applications



Pati's

ICSE Academy

**Prepare for ICSE CLASS 10**
**Free Resources**

**SCAN QR CODE Now**

**Economics** | **Commercial Studies** | **French**

**Robotics & AI** | **Home Science** | **EVS**

**Marathi** | **Gujarati** | **Odiya**



www.spellbeeacademy.com

**Scan QR code** for Free Access to
500+ Prelim Papers across 20 subjects



